# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/04/2023 (बुधवार) दुपार

## घरफोडी

१) पो.स्टे. कुही :— अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील मौजा मांढळ येथे दिनांक ११/०४/२०२३ चे ०९:४५ वा. ते १३:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नत्थु बुधाजी फापसे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड नं. ६ प्राथमिक अरोग्य केंद्रजवळ मांढळ यांचे घराचे दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेले नगदी १३०००/— रू व २३ ग्रॅम सोन्याचे दागीने किंमती अंदाजे ९२,०००/— असा एकुण १०५०००/— रूपयाचा मुद्देमाल तसेच शेजारी राहणारे डोमाजी मेश्राम यांचे ५०००/— रू. नगदी व ८ ग्रॅम सोन्याचे दागीने किंमती अंदाजे ३२०००/—रू. असा एकुण ३७०००/— चा मुद्देमाल व कुसुम बारई यांचे ६०००/— रू. नगदी व १८ ग्रॅम सोन्याचे दागीने किमती अंदाजे ७२०००/— रूपयाचा मुद्देमाल असे एकुण ४९ ग्रॅम सोने किंमती अंदाजे १९६०००/—रू. व नगदी २४०००/—रू. असा एकुण २२००००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. विवेक सोनवणे पोस्टे कुही मो. नं. ८८०५७३०३६२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कुही :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा कुही येथे दिनांक ११/०४/२०२३ चे ११:३० वा. ते १६:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— कवडु नारायण जुमळे, वय ४९ वर्ष रा. वार्ड नं. ०४ भारत माता चौक कुही जि. नागपूर यांचे घराचे दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेले १० ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र किंमती अंदाजे ४००००/—रू. नगदी ४८,०००/—रू. व ०२ तोळे चांदीचा आकडा किंमती अंदाजे २०००/—रू. असा एकुण ९०,०००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. विवेक सोनवणे पोस्टे कुही मो. नं. ८८०५७३०३६२ हे करीत आहे.

# लोहा चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०९ किमी अंतरावर मौजा काळाफाटा शेती शिवार येथे दिनांक ०६/०४/२०२३ चे १०/०० वा. दरम्यान यातील शेत मालक नामे— दिपक धनंजी पटले, रा. वर्धमान नगर प्लॉट नं. ४२ नागपूर यांनी मौजा काळाफाटा शिवारात १७ एकर शेती ३ वर्षे अगोदर विकत घेतली असुन फिर्यादीने त्या शेतामध्ये फार्महाउसचे बांधकाम २ वर्षांपासुन सुरू केले होते व त्या फार्महाउसचे काम पुर्ण झालेले आहेत आणि त्या बांधकामाकरीता विकत आणलेला लोहा बांधकामात उपयोग केला व काही उर्वरीत लोहा १० एम. एम. चे एकूण १५ बंडल व ८ एम. एम. चे २७ बंडल व १२ एम. एम. चे २ बंडल शेतात असलेल्या फार्महाउसला लागुन ठेवले होते त्यातुन १० एम. एम. चे २ बंडल लोहा अंदाजे १४० किलो किंमती अंदाजे ७,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे दि. ०६/०४/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. दरम्यान फिर्यादीला २ बंडल लोहा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे समजले त्या घटनेबाबत फिर्यादी नामे— वसंता गोमाजी वाघाडे, वय ३८ वर्षे, रा. नयाकुंड ता. पारशिवनी यांनी शेतमालकाला फोनव्दारे माहिती दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो. ना./१९६१ मो नं ८६००३६४८२० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**